वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

# खंडणी मिळण्यास अडथळा केला म्हणून संतोष देशमुख यांचा खून

## सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी वाल्मिक कराडसह सर्व आरोपींवर आरोप निश्चित

बीड,(दिव्य न्युज):- संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज बीड येथील मकोका न्यायालयात हायव्होल्टेज सुनावणी पार पडली. या सुनावणीत न्यायालयाने वाल्मीक कराडसह सर्व आरोपींवर अधिकृतपणे आरोप निश्चित केले आहेत. यावेळी मुख्य आरोपी वाल्मिक कराड याने पहिल्यांदाच मौन सोडून न्यायालयासमोर आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, न्यायालयाने पुढील कारवाई सुरू ठेवली.

न्यायाधीशांनी १८०० पानांच्या दोषारोपपत्रातील संपूर्ण घटनाक्रम आरोपींना वाचून दाखवला. तुम्हाला हे आरोप मान्य आहेत का? असा थेट प्रश्न जेव्हा विचारला गेला, तेव्हा वाल्मिक कराडसह सर्व सहा आरोपींनी मान्य नाहीत असे उत्तर दिले. यावेळी कराड स्वतःहून म्हणाला, मला काही बोलायचे आहे. मात्र, कायद्याच्या प्रक्रियेनुसार आता प्रत्यक्ष साक्षीदार आणि पुराव्यांचे काम सुरू होणार आहे.विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी न्यायालयात पुन्हा एकदा ठामपणे सांगितले की, 'आबाडा' कंपनीकडून मिळणाऱ्या खंडणीच्या व्यवहारात संतोष देशमुख हे

▶▶ पान २ वर

# मला बोलायचंय म्हणणाऱ्या वाल्मिक कराडला कोर्टानं फटकारलं

## हो की नाही एवढंच बोला!

बीड ,(दिव्य न्युज):- संतोष देशमुख हत्या प्रकरणी आज बीडच्या विशेष मकोका न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोप निश्चिती केली. आरोपींनी त्यांच्यावर केलेले आरोप मान्य नसल्याचं कोर्टात सांगितलं. यावेळी वाल्मिक कराडने मला बोलायचं असल्याचं न्यायालयात म्हटलं. तेव्हा न्यायालयाने वाल्मिक कराडला फटकारत तुम्ही फक्त हो की नाही ते सांगा असं विचारलं.

आरोप निश्चितीवेळी न्यायालयाने म्हटलं की, खंडणी मागणे, मारहाण करणे, अपहरण करणे, हत्या करणे, जो खंडणीला आड येईल त्याला संपवणे असे वातावरण सर्व तुम्ही आरोपींनी तयार केले. या संदर्भात तुमच्या विरोधात विविध कलमाने गुन्हे दाखल आहेत. तसेच एकत्रितपणे समान उद्देशाने आपण गुन्हे केलेले आहेत आणि पुरावे नष्ट केलेले आहेत याबद्दलही आपल्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल आहेत, मकोका अंतर्गत देखील आपल्यावर गुन्हा दाखल आहे.. सर्व आरोपींना तुमच्यावर असलेले आरोप मान्य आहेत का? असा प्रश्न न्यायालयाने विचारला.आरोप मान्य आहेत का असं विचारताच वाल्मिक कराडने इतर आरोपींप्रमाणे चार वेळा आरोप मान्य नसल्याचं सांगितलं. यावेळी मी काही सांगू इच्छितो असे वाल्मिकने म्हटलं.तेव्हा न्यायाधीश पाटवदकर आरोपीला फटकारत तुम्हाला जेवढे विचारले तेवढे उत्तर द्या. जास्त बोलू नका असे सुनावले. यावेळी आरोपी वाल्मीक कराडने पुढे बोलताना म्हटले की, मला राजकीय द्वेषातून या गुन्ह्यात अडकवले आहे.

आरोपींच्या वकिलांनी फॉरेन्सिककडे दिलेल्या पुराव्यांची कॉपी आम्हाला मिळत नाही तोपर्यंत पुरावा स्वीकारता येणार नाही. आरोप निश्चित करण्याआधी आम्हाला कॉपी द्याव्यात अशी मागणी केली. यावर तपास अधिकाऱ्यांनी खाजगी पुरावे असून त्याचा गैरवापर होऊ शकतो. इतका मोठा डेटा आम्ही देऊ शकत नाही असं सांगितलं. दरम्यान, कोर्टाने सरकारी

पान २ वर
















# खमरुल इमान यांना कॉफ मेंबर करून राष्ट्रवादी काँग्रेसने मित्रपक्षांना न्याय द्यावा



बीड, (दिव्य न्युज):- नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्या विजयासाठी समाजवादी पक्षाने युतीधर्म पाळत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरुल इमान खान यांनी मुस्लिम प्रभागांमध्ये सडेतोड, अभ्यासपूर्ण व तांत्रिक भाषणे करून मुस्लिम समाजाची मते राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे वळविण्यात मोलाचा वाटा उचलला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या विजयात समाजवादी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली असून, त्यामुळे मित्रपक्षांना न्याय देत समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरुल इमान खान यांची बीड नगरपरिषदेत काफ मेंबर म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी बीड शहरातील नागरिकांकडून होत आहे.

ही बाब विसरता कामा नये की, बीड नगरपरिषद निवडणुकीदरम्यान सर्वसाधारणपणे मुस्लिम समाजाची मते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व एमआयएमकडे जाणार, अशी चर्चा होती. मात्र मित्रपक्षाचे उमेदवार प्रेमलता पारवे यांच्या विजयासाठी समाजवादी पक्ष मैदानात उतरला आणि नागरिकांचे लक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे वळविण्याचे काम केले.

समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरुल इमान खान यांनी मुस्लिम प्रभागांमध्ये आमदार व माजी आमदारांकडून मुस्लिम मतांचा कसा दुरुपयोग केला जातो, तसेच मते घेतल्यानंतर त्या प्रभागांना विकासापासून कसे वंचित ठेवले जाते, याची पुराव्यांसह पोलखोल केली. यामुळे मुस्लिम समाजाची मते मित्रपक्षाचे उमेदवार प्रेमलता पारवे यांच्या बाजूने वळविण्यात त्यांची निर्णायक भूमिका ठरली.

संपूर्ण निवडणूक काळात खमरुल इमान खान हे प्रेमलता पारवे यांचे सिपासालार म्हणून ठामपणे उभे राहिले. त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भूमिकेतून विरोधकांना अक्षरशः जमीन दाखवण्याचे काम केले. असे अभ्यासू व लढवय्ये मावळे नगरपरिषदेत असणे गरजेचे असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरुल इमान खान यांची काफ मेंबर म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी शहरातील सुजाण नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शुभम धूत यांचा बीड शहरातून सर्वाधिक मतांनी दणदणीत विजय

## सावित्री नितीन साखरे यांनाही दिला मतदारांनी भरभरून आशीर्वाद



बीड,(दिव्य न्युज):- राजयोग फाउंडेशनच्या माध्यमातून समाजसेवेचा वसा आणि वारसा खंबीरपणे चालवणारे शुभम दिलीप धूत आणि सावित्री नितीन साखरे यांचा नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधून १६८९ सर्वाधिक मतांनी दणदणीत विजय झाला. कायम जनतेच्या सेवेत राहून त्यांच्या सुखदुःखात धाव घेणाऱ्या शुभम भैय्या धूत यांना जनतेने मतदान रुपी आशीर्वाद देऊन विजयाचा गुलाल लावला आहे. बीड शहरातील प्रभाग २ मधून भारतीय जनता पार्टी कडून शुभम भैय्या धूत आणि सावित्री नितीन साखरे हे निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. मंत्री पंकजा ताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनीही निवडणूक लढवली. सुरवातीपासून त्यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली. मतदारांच्या गाठीभेटी घेऊन डोअर टू डोअर प्रचार करत मतदारांना विजयी करण्याचे आवाहन केले होते. विशेष म्हणजे धूत परिवाराचासमाजसेवेचा यज्ञ हा अविरत चालूच आहे तसेच नितीन साखरे यांच्या बद्दल प्रभागामध्ये असलेली सहानुभूती दिसत होती. धूत परिवाराचे सामाजिक कार्य किती मोठे आहे हे सर्वांना माहित आहे. कोरोना काळामध्ये अनेकांच्या मदतीला धावून जात रुग्णांना दिलेला आधार असेल किंवा गोरगरिबांची दिवाळी गोड करून त्यांच्या घरात आनंदाचा दिवा लावण्याचे काम असेल तसेच रमजान ईदला हजारो मुस्लिम बांधवांना शीरखुर्मा किटचे वाटप करणे असेल असे कितीतरी समाजकार्याची उदाहरणे देता येतील. याशिवाय वर्षभर महिने प्रत्येकाच्या सुखदुःखात खंबीरपणे पाठीशी उभा राहून दिलेला आधार असेल या जमेच्या बाजू शुभम धूत आणि साखरे यांना विजयी होण्यासाठी महत्त्वाच्या ठरल्या. शुभम भैय्या धूत म्हणजे हक्काचा आणि कामाचा माणूस प्रत्येकाला अडचणीच्या वेळी मदतीला येणारा माणूस आपल्या वार्डातून निवडणूक लढवत असल्याने मतदारांमध्ये सुरुवातीपासूनच आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कोणत्याही परिस्थितीत शुभम भैय्या धूत यांना नगरपरिषद निवडणुकीमध्ये विजयाचा गुलाल लावण्याचा निर्धार जनतेने करून खरे तर धूत आणि साखरे यांची निवडणूक जनतेनेच हाती घेतल्याचे दिसून येत होते. त्यानंतर माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी शुभम धूत यांच्यासाठी भव्य अशी मोठी सभा घेऊन मतदारांना शुभम धूत यांना विजयी करण्याचे आवाहन केल्यानंतर त्यांना अधिकच बळ मिळाले. याशिवाय योगेश भैय्या क्षीरसागर यांची ताकद पाठीशी होतीच. काल मतमोजणीनंतर निकाल समोर आल्यानंतर बीड नगरपरिषद निवडणुकीमध्ये बीड शहरातून सर्वाधिक मतांनी निवडून येण्याचा बहुमान मिळवत दणदणीत विजय मिळवला. प्रभागती सर्व जाती धर्मातील मतदार बंधू भगिनींनी शुभम भैय्या धूत यांना मतदान रुपी आशीर्वाद दिला.

# भाड्याची कार आणून विक्री करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा बीडमध्ये पर्दाफाश

बीड (दिव्य न्युज):- ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून कार भाड्याने घ्यायची आणि तिची बनावट कागदपत्रांच्या आधारे परस्पर विक्री करायची, इतकेच नाही तर विक्री केलेली कार पुन्हा चोरून न्यायची अशा एका अतिशय चतूर आणि हायटेक आंतरराज्य टोळीचा पेठ बीड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. हैद्राबाद ते नांदेड असा धागादोरा शोधत पोलिसांनी दोन अट्टल गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या असून, या कारवाईमुळे वाहन खरेदी-विक्री करणाऱ्या क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाची सुरुवात पेठ बीड येथील रहिवासी तोफीक खाजा बागवान (वय ३३) यांच्या तक्रारीवरून झाली. तोफीक यांनी एक महींद्रा कंपनीची 'दणत ७००' (क्रमांक ढड २६ क॒५५६) ही कार विकत घेतली होती. मात्र, २८ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास, ज्यांनी ही कार विकली होती, त्यांनीच त्यांच्याकडील दुसऱ्या चावीचा वापर करून ही कार पळवून नेली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तोफीक यांनी पेठ बीड पोलीस ठाण्यात धाव घेतली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करत तांत्रिक तपासाचे चक्र फिरवले.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण केले. तपासाचे धागेदोरे थेट नांदेडपर्यंत पोहोचले. पोलिसांनी नांदेडमध्ये सापळा रचून इंद्रजितसिंग बलजितसिंग बावरी (वय २२, रा. जुना कवठा, नांदेड) याला १७ डिसेंबर रोजी ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता, या मोठ्या रॅकेटचा उलगडा झाला. त्याच्या माहितीवरून पोलिसांनी मोहमद रव्यान मोहमद एजाज (वय २३, रा. मोगलपुरा, हैद्राबाद) याला तेलंगणातून अटक केली.

तपासात धक्कादायक माहिती समोर आली की, हे आरोपी हैद्राबाद येथील 'लाँग ड्राईव्ह कार्स' या कंपनीकडून ऑनलाईन पद्धतीने कार भाड्याने घेत असत. त्यानंतर त्या कारची परस्पर विक्री केली जायची. मात्र, कारचे भाडे थकल्यानंतर किंवा मुदत संपल्यानंतर संबंधित कंपनीची रिकव्हरी टीम 'जीपीएस'च्या मदतीने कारचा शोध घेत असे आणि त्यांच्याकडील दुसऱ्या चावीने कार पुन्हा घेऊन जात असे. यामुळे खरेदीदाराला आपली कार चोरीला गेल्याचे वाटत असे, तर प्रत्यक्षात तो एका मोठ्या फसवणुकीचा बळी ठरलेला असायचा. पोलिसांनी तपासादरम्यान चोरी गेलेली कार जप्त केली आहे.ही धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नित्यानंद उबाळे, नितीन राठोड, हनुमंत उगले, कल्याण जाधव आणि आश्वीन सुरवसे यांनी केली आहे. अशा प्रकारे कुणाची फसवणूक झाली असल्यास पेठ बीड पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जुने वाहन खरेदी करताना केवळ विश्वासावर व्यवहार न करता, कागदपत्रांची अधिकृत खात्री करण्याचे आवाहनही पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

पान ४ वरून

## कापूस, सोयाबीन

प्रति क्विंटल दर निश्चित करण्यात यावा. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (उउख) कडून होणारी अडवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा. हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या बाजार समित्या व व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या शेतमालाचा विक्रीदर व खरेदीदरातील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, सबसिडी, अनुदान व पीक विमा यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## शैक्षणिक क्षेत्रातील

प्राचार्य डॉ. ज. मो. भंडारी यांनी मा. पोखरणा शेठ यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक प्रा. डॉ. अशोक कोरडे, प्रा. डॉ. अनिल गर्जे सर, श्री दीपक जगदाळे तसेच श्री ज्ञानेश्वर खंदारे हे यावेळी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मा. हेमंतकुमार पोखरणा यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा उल्लेख करत, त्यांच्या दीर्घायुष्य व निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. वाढदिवसानिमित्त आनंदी व प्रेरणादायी वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

## मराठवाड्याच्या दिशेने

दिली. जय महाराष्ट्र!

मराठवाड्याच्या भूमीत गरीब, शोषित व वंचितांच्या हक्कासाठी दोन मजबूत संघटनात्मक केंद्रे उभी राहिली असून, शिवसेनेच्या जनआधारित राजकारणाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. मराठवाडा विभागाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष मा. श्री. कैलास पोटफोडे व बीड जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र नाटकर यांनी आपल्या भाषणात ठामपणे सांगितले -

या शाखा गरीबांच्या हृदयाचा ठोका बनतील आणि शिवसेनेचा बुलंद नारा प्रत्येक वस्ती-वस्तीपर्यंत घुमेल!

कार्यक्रमात फडकणारे भगवे झेंडे, कार्यकर्त्यांचा सळसळता उत्साह आणि अँड चंद्रकांत नवले यांची ठाम हुंकार - हे सर्व एका नव्या परिवर्तनाची साक्ष देत होते.

नव्या शाखांचे धुरीण - नवे नेतृत्व, नवे बळ

१. भीमराव नाटकर (राक्षसभुवन)
२. अण्णा कुधाडे (खामगाव)
३. बजरंग कोढरे
४. प्रकाश नाटकर
५. ज्ञानेश्वर नवले
६. संदीप वाणी
७. भाऊ करडे
८. कैलास सरडे
९. किरण नाटकर
१०. सुभाष पोटफोडे
११. महादेव पोटफोडे

या सर्वांनी शपथ घेतली -

बीड जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाला न्याय, सुविधा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवर

* उपजिल्हाप्रमुख मा. नारायण शिंदे
* उपजिल्हाप्रमुख मा. विक्रमराजे भोसले
* तालुकाप्रमुख मा. उद्धवजी मडके
* शहरप्रमुख मा. मुकेशजी महाजन
* जइउ सेल तालुकाप्रमुख मा. बाळासाहेबजी खेडकर
* युवासेना शहरप्रमुख मा. गणेशजी पवार
* नागेश मिठे पाटिल
* अशोक गवते
* शिवराज उगले

उमटलेला जनसागर

* शिवसेनेचे ज्येष्ठ, युवा व महिला कार्यकर्ते
* विविध गावांतील व झोपडपट्टीतील संघर्षशील माता-भगिनी
* गावकऱ्यांचा उत्स्फूर्त व अभूतपूर्व प्रतिसाद

शिवसेना ही गरिबी हटवण्यासाठी जन्मलेली चळवळ आहे. राक्षसभुवन व खामगावचा प्रत्येक संघर्ष हा आमचा संघर्ष आहे. एकजूट होऊया, भगवा अधिक बुलंद करूया!

शाखा उद्घाटनानंतर झोपडपट्टीतील समस्या निराकरण, स्वच्छता अभियान व स्वावलंबनासाठी सामूहिक प्रयत्नांचा संकल्प करण्यात आला.

ही दोन शाखा बीड जिल्ह्याच्या विकासाचा मजबूत पाया ठरणार आहेत.

शिवसेना झिंदाबाद!

गेवराई तालुक्यात गरीबांचा उद्धार - शिवसेनेचा विस्तार

पान १ वरून

## हो की

वकिलांना त्यांच्याकडे पुरावे मिळताच आरोपींच्या वकिलांना द्यावे असं सांगितलं.सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी सांगितलं की, आज आरोप निश्चित केले आहेत. खंडणी मिळण्यास अडथळा केला म्हणून संतोष देशमुख यांचा खून केला. पुढील सुनावणी ८ जानेवारी रोजी होईल. आजही आरोपी वकिलांनी या खटल्यात डी फॉर डीले आणि डी फोर डीरेल केले गेले. खटल्यात विलंब लावणे व खटला उलटवून टाकण्याचा प्रयत्न असे आरोप आहेत.प्रत्यक्ष पुराव्याचे काम लवकरच सुरू होईल. तीच ती कारणे न्यायालयात मांडली जात होती त्यामुळे न्यायालयाने आदेश करावा अशी विनंती केली. आरोप निश्चित करण्यात किती वेळ लागला हे पाहिले. खटला लवकरात लवकर चालवण्याचा प्रयत्न केला जात आहे असंही उज्ज्वल निकम यांनी सांगितलं.

## खंडणी मिळण्यास

अडथळा ठरत होते. याच रागातून आरोपींनी त्यांना टाकळी शिवारात नेऊन अमानुष मारहाण केली. आरोपींनी केवळ हत्या केली नाही, तर त्याचे १५ व्हिडिओ आणि ८ फोटो काढून त्या क्रूरतेचा आनंद साजरा केला. हे व्हिडिओ आता आरोपींच्या वकिलांना देण्यात आले असून, हेच व्हिडिओ या खटल्यातील सर्वात मोठा पुरावा ठरणार आहेत.आजच्या सुनावणीनंतर उज्वल निकम यांनी आरोपींच्या वकिलांवर खटला लांबवणे आणि दिशाभूल करणे असा गंभीर आरोप केला. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, लवकरच प्रत्यक्ष साक्षीदारांची उलटतपासणी सुरू होईल.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आज (२३ डिसेंबर) बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात पुन्हा सुनावणी झाली. या सुनावणीमध्ये न्यायाधीशांनी सर्व आरोपींना असलेल्या गुन्ह्याबाबत माहिती दिली. यादरम्यान न्यायधीशांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडसह अन्य आरोपींना एक प्रश्न विचारला. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात २३ वी सुनावणी झाली. मागील सुनावणीत आरोपी विष्णू चाटेच्या जामीन अर्जावर युक्तिवाद झाला होता. तसेच संतोष देशमुखांच्या हत्येचे व्हिडीओ आरोपींच्या वकिलांना दिल्यानंतर सर्व आरोपींवर आज आरोप निश्चित करण्यात आले. सरपंच संतोष देशमुखांच्या हत्याप्रकरणीच्या सुनावणीत न्यायाधीशांनी सर्व आरोपींना असलेल्या गुन्ह्याबाबत माहिती दिली. संपूर्ण घटनाक्रम आरोपीला वाचून दाखवत हे तुम्हाला मान्य आहे का?, असा सवाल विचारला. न्यायाधिशांच्या या प्रश्नावर वाल्मिक कराडसह सर्व आरोपींनी आरोप मान्य नसल्याचे म्हटले. यावेळी वाल्मिक कराड पहिल्यांदाच न्यायालयासमोर स्वत:हून आरोप मान्य नसल्याचं बोलला. तसेच मला बोलायचं आहे, असंही वाल्मिक कराड म्हणाला. आता सदर प्रकरणी ८ जानेवारी रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

विशेष सरकारी वकील उज्वल निकम म्हणाले की, आज आरोप निश्चित केले आहेत. खंडणी मिळण्यास अडथळा केला म्हणून संतोष देशमुख यांचा खून केला. पुढील सुनावणी ८ जानेवारी रोजी होईल. आजही आरोपी वकिलांनी या खटल्यात डी फॉर डीले आणि डी फोर डीरेल केले गेले. प्रत्यक्ष पुराव्याचे काम लवकरच सुरू होईल. तीच तीच कारणे न्यायालयात मांडली जात होती. त्यामुळे न्यायालयाने आदेश करावा अशी विनंती केली. खटला लवकरात लवकर चालवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असं उज्वल निकम यांनी सांगितले. ९ डिसेंबर २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील केज तालुक्याच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाली होती. या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य ढवळून निघाले होते. सुदर्शन घुले, जयराम चाटे, श्रीकृष्ण आंधळे, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार या सहा आरोपींनी संतोष देशमुख यांना टाकळी शिवारात नेले. या ठिकाणापासून एका बाजूला सुदर्शन घुलेचे शेत आहे. त्याच ठिकाणी अत्यंत क्रूरपणे आरोपींनी सरपंच संतोष देशमुख यांना मारहाण केली. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचे फोटो आरोपीने आपल्या मोबाईलमध्ये काढले होते. १५ व्हिडीओ आणि ८ फोटो आरोपीकडे मिळाल्याची नोंद आहे. या व्हीडिओत ते आरोपी प्रत्यक्ष मारताना आणि आनंद साजरा करताना दिसत आहेत. हे फोटो जेव्हा पहिल्यांदा माध्यमांमध्ये आले आणि सोशल मीडियावर आले तेव्हा राज्यात संतापाची लाट उसळली होती. १२ मार्च रोजी या प्रकरणाची पहिली सुनावणी न्यायालयात झाली होती. पोलिसांनी न्यायालयात १८०० पानांचे चार्जशीट सादर केले होते. त्यात ही घटना कशी घडली, नेमके कोणते पुरावे पोलिसांच्या हाती लागले? याचे तपशील दिले आहेत. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रभर पडसाद उमटले होते. नंतर अटकसत्र सुरू झाले होते.